सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना; सहभागी होण्याचे शेतकऱ्यांना आवाहन >>पान 2

औषध क्षेत्रातील नावीन्यपूर्ण संशोधन व विकासासाठी सुविधायुक्त भव्य केंद्र उभारणार : मंत्री नरहरी झिरवाळ >>पान 3

शहराच्या विकासासाठी किशोर गारोळे नगराध्यक्षपदी निवडून द्या >>पान 4

**सुविचार**


जीवनात जे तुम्ही करता ते प्रेमाने करा.
- डॉ. स्माईल ब्लँटन

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 110 ■ बुधवार, दि. 26 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




**मृणाल-धनुषच्या कमेंटमुळे पुन्हा सुरु झाल्या डेटिंगच्या चर्चा:अभिनेत्रीच्या नवीन चित्रपटावर साउथ स्टारने दिली प्रतिक्रिया, पोस्ट व्हायरल**

आतील पान

# अयोध्येतील राम मंदिरावर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते धर्म ध्वजारोहण

**लखनऊ/वृत्तसंस्था** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी अयोध्येतील राम मंदिराचं धर्म ध्वजारोहण करण्यात आलं. या कार्यक्रमाला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले ''जर २०४७ पर्यंत भारताला समृद्ध करायचे असेल तर प्रत्येकानं आपल्यातील राम जागृत केला पाहिजे. अयोध्या देशाच्या उन्नत चेतनेचा आणखी एक बिंदू बनत आहे. आज संपूर्ण जग आणि भारत राममय बनला आहे.''

**धर्मध्वज शतकानुशतके टिकून राहिलेल्या स्वप्नाचं प्रतीक**

प्रत्येक रामभक्ताच्या हृदयात समाधान, आनंद आणि कृतज्ञता आहे. शतकानुशतके सोसलेल्या दु:खाचा अंत होत आहे. शतकानुशतके केलेले संकल्प अखेर पूर्ण होत आहेत. आज एका अशा यज्ञाची पूर्तता होत आहे, ज्याचा अग्नी वर्षांपासून धगधगत होता. या यज्ञातून क्षणभरही श्रद्धा विचलित झाली नाही. आज भगवान श्री रामाच्या गर्भगृहाची असीम ऊर्जा आणि दैवी शक्ती या धर्मध्वजात विराजमान आहे. तो भारतीय संस्कृतीच्या पुनर्जागरणाचा ध्वज आहे. त्याचा भगवा रंग, त्यावर कोरलेली सूर्यवर्षाची कीर्ती, ओम शब्द रामराज्याचे वैभव वाढवतात. हा ध्वज संकल्प, यश आणि शतकानुशतके जपलेल्या स्वप्नाचं प्रतीक आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

**ध्वज सत्य हे ब्रह्माचे रूप**

''हा ध्वज संतांच्या आध्यात्मिक साधना आणि समाजाच्या सहभागाचा अर्थपूर्ण परिणाम आहे. येणाऱ्या शतकांमध्ये हा ध्वज राम आणि सत्यमेव जयतेचे आदर्श घोषित करेल. हा ध्वज सत्य हे ब्रह्माचे रूप आहे असं घोषित करेल. धर्म सत्यावर आधारित आहे. हा धार्मिक ध्वज आपल्याला आपल्या जीवनाचं बलिदान देण्यासाठी प्रेरित करेल. परंतु आपल्या वचनांचं बलिदान देण्यासाठी नाही. धर्म ध्वज हा संदेश देईल की जगाची




निर्मिती कृतीवर आधारित आहे. हा ध्वज आपल्याला असा समाज निर्माण करण्याचा संकल्प करेल जिथं गरिबी नाही, कोणीही दु:खी किंवा असहाय्य नसेल, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

**ही ती भूमी आहे जिथं आदर्शांचं आचरणात रुपांतर होतं**

आपल्या धर्मग्रंथांमध्ये असं म्हटलं आहे की, जे काही कारणास्तव मंदिरात जाऊ शकत नाहीत. परंतु दूरवरून मंदिराच्या ध्वजाला वंदन करतात त्यांनाही तेच पुण्य मिळतं. हा धार्मिक ध्वज दूरवरून रामलल्लाच्या जन्मस्थळाची झलक देईल. तो येणाऱ्या युगानुयुगे सर्व मानवजातीला भगवान रामाचे आदर्श पोहोचवेल. मी जगभरातील लाखो रामभक्तांना माझ्या शुभेच्छा देतो. राम मंदिराच्या बांधकामात सहभागी असलेले भक्त, परोपकारी, कारागीर, कामगार आणि वास्तुविशारद यांचं मी अभिनंदन करतो. ही ती भूमी आहे जिथं आदर्शांचं आचरणात रूपांतर होतं. ही ती भूमी आहे जिथं भगवान राम यांनी आपलं जीवन सुरू केलं,'' असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

**राम मंदिराची प्रक्रिया आज पूर्ण**

या चळवळीत, आम्ही ५०० वर्षे सतत स्वत:ला सिद्ध केलं. आम्हाला सत्यावर आधारित भारत स्थापन करायचा आहे. राम मंदिराची प्रक्रिया आज पूर्ण झाली आहे. जगाच्या पाठीवर भारताला सिद्ध करण्याचं काम सुरू आहे. आपण सर्वांनी मिळून पुन्हा एकदा भारत स्थापन करायचा आहे. आज आपल्या स्वप्नपूर्तीचा दिवस आहे. संकल्पाची पुनरावृत्ती आहे. पृथ्वीवरील लोकांनी भारताकडून चारित्र्याचे धडे घेतले पाहिजेत, भारत असा देश असावा. रामलल्लाचे नाव घेऊन या कार्याची गती वाढवणे हे आपले कर्तव्य आहे'', असं मोहन भागवत म्हणाले.

**प्रत्येक दिशेला रामराज्य स्थापित झालं**

गेल्या ५०० वर्षात साम्राज्ये बदलली आहेत, पिढ्या बदलल्या, परंतु श्रद्धा अढळ राहिली आहे. जेव्हा आरएसएसनं सत्ता हाती घेतली तेव्हा राम लल्लाच्या घोषणा ऐकू येऊ लागल्या. एक काळ असा होता जेव्हा अयोध्या दु:खाचं प्रतीक बनली होती. आता अयोध्येत प्रत्येक दिवस उत्सवाचा असतो. प्रत्येक दिशेला रामराज्य स्थापित झालं आहे. शहरानं एका नवीन युगात प्रवेश केला आहे. इथं धर्ममार्ग, राममार्ग, भक्तीमार्ग, पंच कोशी, १४ कोशी आणि ८४ कोशी परिक्रमा भक्तांना आनंद देतात. अयोध्येत आता विमानतळ आहे. अयोध्या आता उत्तर प्रदेशची नवीन अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. ते देशातील पहिले सौर शहर देखील आहे. आज आपल्यासाठी स्वाभिमानाचा दिवस आहे. मी या प्रसंगी पंतप्रधान मोदी, मोहन भागवत आणि संतांचे स्वागत करतो, असं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले.

# राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर टांगती तलवार कायम

## आता शुक्रवारी होणार सुनावणी

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या ओबीसी आरक्षणासंबंधीच्या याचिकेवर आज (२५ नोव्हेंबर) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. यावेळी सॉलिसिटर जनरल याप्रकरणात वेळ आणखी वाढवून देण्याची मागणी केली. ही मागणी मान्य करत सर्वोच्च न्यायलायने याप्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी (२८ नोव्हेंबर) ठेवली आहे. त्यामुळे सुनावणी लांबल्याने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर टांगती तलवार कायम आहे.**

**सर्वोच्च न्यायालयात आज काय काय घडलं?**

याचिकाकर्ता- बांठिया आयोगाच्या आधीच्या परिस्थित मध्ये ओबीसीला आरक्षण नव्हतं..तेव्हाचा कायदा म्हणजे खानविलकर यांच्या खंडपीठाने दिलेले निकालपत्र ..ज्यात आरक्षणच नव्हतं.

तुषार मेहता ( सॉलिसिटर जनरल ) - कोर्टाला ठरवू दे

तुषार मेहता - आम्ही सद् हेतूने कोर्टाच्या आदेशाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला ..आम्ही अजून माहिती घेतो आहे ..पण एक दिवस नंतर सुनावणीला ठेवता येईल का ?..नगरपंचायत आणि महानगरपालिका निवडणुका आहेत. २ डिसेंबर ..२४६ परिषद , ४२ नगर पंचायत निवडणुका आहेत ..जिल्हा परिषद पंचायत समिती आणि महानगरपालिका बाकी आहेत

इंदिरा जयसिंग (याचिकाकर्ता)- आधीच निवडणुका जाहीर आहेत. अर्ज भरून झाले आहेत.

याचिकाकर्ता- ४० टक्के नगरपरिषदेत पन्नास टक्के आरक्षण उल्लंघन झाले आहेत.

सरन्यायाधीश सूर्यकांत- आज आम्ही कोणतेही मत मांडत नाही.

तुषार मेहता- गुरूवारी किंवा शुक्रवारी ठेवूया.

निवडणूक आयोगाकडून वेळ वाढवून मागितला. त्यावर याचिकाकर्त्यांने जोरदार आक्षेप घेतला.याचिकाकर्ता- ५० टक्के आरक्षण उल्लंघन झाले आहे.

सरन्यायाधीश- शेवटी या प्रकरणातील आदेशाला बांधील असूनच निवडणूक होणार आहेत.

आयोग- आज तुम्ही निर्णय केलात तर त्यानुसार आम्हाला आरक्षण वर्गवारी करावी लागेल.

शुक्रवारी याच वेळेला १२ वाजता

सरन्यायाधीश सूर्यकांत - शुक्रवारी पुढील सुनावणी

**काय आहे नेमका वाद?**

विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा दावा आहे की काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा अनुपात घटनात्मक ५० टक्के मर्यादेपेक्षा जास्त ठेवण्यात



आला आहे, जे कायद्याच्या विरोधात आहे. मात्र असा की, बांठिया आयोगाच्या अहवालाचा संदर्भ घेत आरक्षणाची रचना योग्य पद्धतीने करण्यात आली आहे, असा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला आहे.

**५०% आरक्षण मर्यादा किती ठिकाणी ओलांडली जात आहे?**

जिल्हा परिषद - ३२ पैकी १७ जिल्हा परिषदांमध्ये

पंचायत समिती- ३३६ पैकी ८३ पंचायत समित्यांमध्ये

नगरपालिका- २४२ पैकी ४० नगरपालिका क्षेत्रात

नगर पंचायत- ४६ पैकी १७ नगरपंचायतींमध्ये

महापालिका- २९ पैकी २ महापालिका क्षेत्रात

## नगरपरिषदांमध्ये आरक्षणाच्या ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या आरक्षणासंबंधीच्या याचिकेवर आज (२५ नोव्हेंबर) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. यावेळी सॉलिसिटर जनरल याप्रकरणात वेळ आणखी वाढवून देण्याची मागणी केली. ही मागणी मान्य करत सर्वोच्च न्यायलायने याप्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी (२८ नोव्हेंबर) ठेवली आहे. त्यामुळे सुनावणी लांबल्याने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर टांगती तलवार कायम आहे. विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा दावा आहे की काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा अनुपात घटनात्मक ५० टक्के मर्यादेपेक्षा जास्त ठेवण्यात आला आहे, जे कायद्याच्या विरोधात आहे. मात्र असा की, बांठिया आयोगाच्या अहवालाचा संदर्भ घेत आरक्षणाची रचना योग्य पद्धतीने करण्यात आली आहे, असा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला आहे. दरम्यान, राज्यातील ४० नगरपरिषदांमध्ये आरक्षणाच्या ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन झाले, याची माहितीही समोर आली आहे.

राज्यातील कोणत्या नगरपरिषदांमध्ये आरक्षणाच्या ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन झाले आहे?

चिखलदरा- ७५ टक्के, जव्हार- ७० टक्के, कन्हान पिंपरी- ७० टक्के, बिलोली- ६५ टक्के, त्र्यंबक- ६५ टक्के, पिंपळगाव बसवंत- ६४ टक्के, पुलगाव- ६१.९० टक्के, तळोदा- ६१.९० टक्के, इगतपुरी- ६१.९० टक्के, बल्लारपूर- ६१.७६ टक्के, पाथरी- ६०.८७ टक्के, पूर्णा- ६०.८७ टक्के, मनमाड- ६०.६१ टक्के, कुंडलवाडी- ६० टक्के, नागभीड- ६० टक्के, धर्माबाद- ५९.०९ टक्के, घुघुस- ५९.०९ टक्के, कामठी- ५८.८२ टक्के, नवापूर- ५६.५२ टक्के, गडचिरोली- ५५.५६ टक्के, उमरेड- ५५.५६ टक्के, वाडी (नागपूर)- ५५.५६ टक्के, ओझर- ५५.५६ टक्के, भद्रावती- ५५.१७ टक्के, उमारी (नांदेड)- ५५ टक्के, साकोली (शेंदुरवाफा)- ५५ टक्के, चिमूर- ५५ टक्के, आरमोरी- ५५ टक्के, खापा (नागपूर)- ५५ टक्के, पिंपळनेर- ५५ टक्के, आर्णी- ५४.५५ टक्के, पांढरकवडा- ५४.५५ टक्के, डिगडोह(नागपूर)- ५४-१७ टक्के, दौंड- ५३.८५ टक्के, राजुरा- ५२.३८ टक्के, देसाईगंज- ५२.३८ टक्के, बुटीबोरी- ५२.३८ टक्के, ब्रह्मपुरी - ५२.१७ टक्के, शिर्डी- ५२.१७ टक्के, दर्यापूर- ५२ टक्के, कटोल- ५२ टक्के, यवतमाळ- ५१.७२ टक्के, तेल्हारा- ५० टक्के.

## नक्षलवाद्यांच्या तीन राज्यांच्या समितीची विनंती; १५ फेब्रुवारीपर्यंत वेळ द्या, आम्हीही शरण येणार!



**गडचिरोली/प्रतिनिधी** : नक्षल संघटनेचा म्होरक्या भूपती आणि रूपेशचे शेकडो सहकाऱ्यांसह आत्मसमर्पण व त्यानंतर सहा दिवसांपूर्वी चकमकीत हिडमाचा झालेला मृत्यू. यामुळे धास्तावलेल्या नक्षलवाद्यांच्या महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड (एमएमसी) समितीने तिन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांकडे आत्मसमर्पणासाठी १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंतची वेळ मागितली आहे. 'एमएमसी'चा प्रवक्ता अनंत याने याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे.

केंद्रीय गृहमंत्र्यांनी दिलेली नक्षलमुक्त भारताच्या 'डेडलाईन'ला अवघ्या चार महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे सुरक्षा दलांनी नक्षलविरोधी मोहीम अधिक तीव्र केली आहे. गेल्या वर्षभरात सुरक्षा यंत्रणांच्या कारवाईत ३५० हून अधिक नक्षलवादी ठार झाले आहे. यात महासचिव बसवराजू आणि हिडमासह सहा केंद्रीय समिती सदस्यांचा समावेश आहे. सोबतच भूपती आणि रूपेशसारख्या वरिष्ठ नेत्यांनी शेकडो सहकाऱ्यांसह आत्मसमर्पण केले आहे.तत्पूर्वी शांतता चर्चा आणि शस्त्रसंधीवरून नक्षल संघटना दोन गटात विभागली गेली होती. मात्र, हिडमाच्या मृत्यूनंतर उर्वरित नेते दहशतीत असून लवकरच तेही आत्मसमर्पण करतील अशी चर्चा आहे. दरम्यान, नक्षल्यांच्या 'एमएमसी' विशेष विभागीय समितीने एक पत्रक जारी केले असून त्यांनी यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांचा उल्लेख करून आत्मसमर्पणासाठी १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत वेळ देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.भूपती आणि चंद्रन्नासारख्या मोठ्या म्होरक्यांनी शस्त्रे खाली ठेवली. त्यामुळे आमच्यापुढे आत्मसमर्पणाशिवाय पर्याय नाही. परंतु समितीतील इतर सदस्यांना हा निर्णय कळवण्यासाठी आम्हाला वेळ हवा आहे.




# बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आता प्रत्येक जिल्ह्यात प्राणीसंग्रहालय उभारण्याचा प्रस्ताव: वनमंत्री गणेश नाईक

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी** : गेल्या काही महिन्यात गावोगावी दिसणाऱ्या बिबट्यांची दहशत हा लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न बनला आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी वन विभागाची महत्त्वाची आढावा बैठक संपन्न झाली. बैठकीत वन विभागाच्या संरचनात्मक विस्तारीकरण आणि आर्थिक तसेच कार्यात्मक सबलीकरणासंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी वनमंत्र्यांनी काही सूचना केल्या आहेत.

सागवानाची लागवड करण्याच्या सूचना : वनमंत्र्यांनी वन विभागाच्या प्रत्येक परिक्षेत्रात किमान १०० हेक्टर क्षेत्रावर सागवानाची लागवड करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, वनविकास महामंडळाच्या ताब्यातील लाकडापासून भांडवल उभारणी करून त्याद्वारे विविध विकासकामे करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यावर्षी वन विभागामार्फत राज्यात एकूण १ कोटी ३० लाख बांबू रोपांची लागवड करण्यात आली आहे, अशी माहितीदेखील यावेळी देण्यात आली.

मादी बिबट्यांना लावणार कॉपर-टी : राज्यभरात बिबट्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्यानं संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी वन विभागानं नवीन प्रयोग



हाती घेतला आहे. मादी बिबट्यांना 'कॉपर-टी' लावण्यात येणार असल्याची माहिती वनमंत्र्यांनी दिली आहे. हा प्रयोग तीन महिन्यांच्या कालावधीत यशस्वी ठरला की नाही, याबाबतची माहिती लवकरच समजेल, असंही राज्याचे वनमंत्री नाईक यांनी सांगितलं.

जिल्हास्तरावर प्राणीसंग्रहालय उभारणार : बिबट्यांची वाढती संख्या नियंत्रित करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात येणार आहेत. याअंतर्गत प्रत्येक जिल्हास्तरावर प्राणीसंग्रहालय स्थापन करण्याबाबत प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. ज्या ठिकाणी वन विभागाची मध्यवर्ती क्षेत्रं आहेत, त्या ठिकाणी प्राणीसंग्रहालय निश्चित करण्याचा आमचा मानस आहे, असंही वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितलं.

अनावश्यक वृक्षतोड टाळा : वनमंत्र्यांचे निर्देश : नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होण्याच्या प्रस्तावावर पर्यावरणप्रेमींनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे वनमंत्री गणेश नाईक म्हणाले, ''अनावश्यक वृक्षतोड होता कामा नये. याबाबत आम्ही नाशिकच्या संबंधित अधिकाऱ्यांशी तत्काळ चर्चा करू. झाडांची कमीत कमी कत्तल व्हावी आणि जिथे शक्य असेल तिथे वृक्षांचे स्थलांतर करता येईल, अशा उपाययोजना आखल्या जातील.''

## संविधान; भारताचा राष्ट्रीय ग्रंथ

आज २६ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७६ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७६ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी-परंपरा या सर्वांना एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान. आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्र्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्र्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्र्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ; आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत. ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. संपूर्ण संविधान याच उद्देशिकेवर आधारित आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना फार महत्त्व देण्यात आले आहे. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले आहेत. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक मालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली आहेत. आपल्या हक्कांसोबत आपल्या कर्तव्याचीही जाणीव करुन देणारे व जगातील सर्वात मोठे असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास जाणून घ्यायला हवा. २६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी एन राव हे या समितीचे सल्लागार होते. या समितीत पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना आझाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, एस. आर. जयकर, सरोजिनी नायडू, हंसाबेन मेहता, राजकुमारी कौर यांचा मान्यवर सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. घटना समितीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४७ रोजी स्वीकारण्यात आला. तोच २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला. संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम मुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्यामुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला. शेवटी २४ जानेवारी १९५० रोजी अंतिम बैठक झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य बनले त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण मोठया उत्साहात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. संविधान निर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करुन डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार केली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते.

# सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना; सहभागी होण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना यावर्षीच्या रबी हंगामासाठी राबविण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. सुधारित पिक विमा योजनामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होण्यासाठी रब्बी ज्वारीसाठी ३० नोव्हेंबर तर गहू, हरबरा कांद्यासाठी १५ डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कृषि उपसंचालक अ. भा. गावडे यांनी केले आहे.



जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी २०२५-२६ हंगामकरिता (८०:११०) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र धरून राबवण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार विमा कंपन्यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून भारतीय कृषी विमा कंपनीची निवड करण्यात आली आहे.

योजनचा उद्देश : नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, कृषि क्षेत्रासाठी पतपुरवठ्यात सातत्य राखणे, उत्पादनातील जोखीम पासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबर अन्नसुरक्षा पिकांचे विविध कारण आणि कृषि क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ होण्यास मदत होईल.

योजनेचे वैशिष्टे : सदर योजना अधिसूचित पिकांसाठी केवळ अधिसूचित क्षेत्रासाठी लागू असेल. योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे, अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांचे वैयक्तिक कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत भाडेकरार पिक विमा संकेत स्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामसाठी १.५० टक्के व नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. या योजनेंतर्गत रब्बी २०२५-२६ हंगामकरिता १ वर्षासाठी सर्व अधिसुचित पिकांसाठी जोखीमस्तर ७० टक्के असा निश्चित करण्यात आला आहे.

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील सात वर्षापैकी सर्वाधिक उत्पादनाच्या पाच वर्षाची सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाईल. या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे तसेच अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो प्रस्ताव रद्द करण्यात येईल. योजनेमध्ये सहभागी घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे अनिवार्य असेल. पिक विमा नुकसान भरपाईसाठी ई पिक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. बोगस पीकविमा प्रकरणात फौजदारी कार्यवाही करण्यात येईल. पीकविमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी केंद्रधारकास ४० रुपये मानधन केंद्र शासनाने निश्चित केले असून विमा कंपनीमार्फत सीएससी केंद्र धारकास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी केंद्रधारकास देऊ नये. योजनेअंतर्गत गहू, हरबरा व कांदा पिकांकरीता रब्बी हंगाम २०२५-२६ करिता पिक कापणी प्रयोगाद्वारे प्राप्त उत्पादनास ५० टक्के भारांकन देऊन विमा क्षेत्र घटकातील सरासरी उत्पादकता निश्चित करण्यात येईल.

योजने अंतर्गत रब्बी हंगामा करिता पीक पेरणी पासून काढणीपर्यतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पिक उत्पादनावर विपरीत परिणाम करणारे इतर बाबीमुळे हंगामाच्या शेवटी पीक कापणी प्रयोग आधारे किंवा तांत्रिक उत्पादन आधारे महसूल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसान भरपाई देय राहील.

पिक निहाय शेतकरी हिस्सा विमा हप्ता दर प्रति हेक्टर गहूसाठी ४५० रुपये, हरबरा ४५० रुपये, रब्बी कांदा २२५ रुपये निश्चित केला आहे. अधिक माहितीसाठी https://pmfby.gov.in या वेबसाइटवर किंवा हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १४४४७ किंवा आपल्या नजीकच्या सीएससी केंद्र, कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

## मृणाल-धनुषच्या कमेंटमुळे पुन्हा सुरू झाल्या डेटिंगच्या चर्चा:अभिनेत्रीच्या नवीन चित्रपटावर साउथ स्टारने दिली प्रतिक्रिया, पोस्ट व्हायरल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** साउथ अभिनेता धनुष आणि अभिनेत्री मृणाल ठाकूर काही काळापूर्वी त्यांच्या प्रेमसंबंधांमुळे चर्चेत होते. अशा बातम्या होत्या की, ते दोघे एकमेकांना डेट करत आहेत. आता पुन्हा एकदा हे दोघे त्यांच्या नात्यामुळे चर्चेत आले आहेत आणि यावेळी कारण त्या दोघांनी केलेल्या कमेंट आहे.

खरं तर, चित्रपट निर्माता संजय लीला भन्साली यांच्या नवीन चित्रपट दो दिवाने सहर में मध्ये मृणाल ठाकूर आणि सिद्धांत चतुर्वेदी मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. २१ नोव्हेंबर रोजी निर्मात्यांनी चित्रपटाचे पहिले पोस्टर शेअर केले, त्यानंतर यावर चाहत्यांसोबत अनेक सेलिब्रिटींनीही प्रतिक्रिया दिल्या. याच दरम्यान धनुषने कमेंट करत लिहिले, पाहण्यासाठी आणि ऐकण्यासाठी चांगले वाटत आहे. याला उत्तर म्हणून मृणाल ठाकूरने लाल हृदय आणि सूर्यफूल इमोजी पोस्ट केले.

या कमेंटनंतर सोशल मीडियावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली की, धनुष आणि मृणाल ठाकूर एकमेकांना डेट करत आहेत. यापूर्वीही या दोघांच्या डेटिंगच्या बातम्या याच वर्षी ऑगस्टमध्ये सन ऑफ सरदार २ चित्रपटाच्या प्रीमियरदरम्यान समोर आल्या होत्या. याशिवाय, धनुषच्या तेरे इश्क में चित्रपटाच्या रॅप-अप पार्टीतही मृणाल ठाकूर दिसली होती. मात्र, अद्याप दोघांकडूनही यावर कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. सांगायचे झाल्यास, दो दीवाने सहर चित्रपटाची घोषणा करताना निर्मात्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले होते, दो दिवाने, एक सहर आणि एक पूर्णपणे परिपूर्ण प्रेमकथा. या व्हॅलेंटाईन डेला प्रेम होईल. यासोबतच निर्मात्यांनी हे देखील सांगितले की, हा चित्रपट २० फेब्रुवारी २०२६ रोजी प्रदर्शित होईल.

# नवीन कामगार कायदे : स्वरुप, लाभ आणि अंमलबजावणीची कसोटी

भारतातील कामगार कायद्यांच्या इतिहासात २१ नोव्हेंबर २५ हा दिवस कामगारांसाठी महत्त्वाचा ठरला आहे. या दिवशी केंद्र सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत चार कामगार संहिता तत्काळ प्रभावाने लागू केल्या. या चार संहितांनी मागील २९ जुन्या आणि अनेक दशकांपासून अस्तित्वात असलेल्या केंद्रीय कामगार कायद्यांची जागा घेतली आहे. जुन्या कायद्यांची गुंतागुंत, त्यांची कालबाह्यता आणि आधुनिक अर्थव्यवस्थेशी जुळवून घेण्याची त्यांची अक्षमता ही २९ कायदे रद्द करण्यामागची मुख्य कारणे होती. 'आधुनिक अर्थव्यवस्थेला अनुरूप कायदेशीर चौकट' आणि 'व्यवसाय सुलभीकरण' तसेच 'जीवनमान सुलभीकरण' ही उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा सरकारचा दावा आहे. नवीन कायद्यांमुळे एका बाजूला कामगारांना व्यापक सामाजिक सुरक्षा मिळण्याची अपेक्षा आहे, तर दुसऱ्या बाजूला उद्योगांना अनुपालनाचा भार कमी होऊन उत्पादनक्षमतेत वाढ होण्याची आशा आहे असे कायदा निर्माणकर्त्यांचे म्हणणे आहे.




चार संहितांचा विस्तृत आशय

नवीन कामगार कायदे प्रामुख्याने चार संहितांमध्ये समाविष्ट आहेत, ज्यांचा मूळ उद्देश जुन्या कायद्यांचे सुसूत्रीकरण करणे आहे.

**१. वेज कोड २०१९**

किमान वेतनाची राष्ट्रीय अंमलबजावणी: देशभरातील सर्व कामगारांना किमान वेतनाची कायदेशीर हमी मिळाली आहे. केंद्र सरकारने निश्चित केलेल्या 'राष्ट्रीय किमान वेतन' पेक्षा कोणताही पगार कमी असणार नाही.

नियुक्तीपत्र: नोकरी सुरू करताना प्रत्येक कामगाराला नियुक्तीपत्र देणे अनिवार्य केले आहे, ज्यामुळे रोजगाराच्या अटींमध्ये पारदर्शकता येईल.

वेळेवर पगार: नियोक्त्यांना कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर देणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे.

ओव्हरटाईम: ओव्हरटाईम साठी दुप्पट वेतन देण्याची तरतूद आहे.

**२. इंडस्ट्रियल रिलेशन्स कोड २०२०**

उद्योग वाद निवारण: औद्योगिक वाद जलद गतीने आणि पारदर्शकपणे सोडवण्यासाठी यंत्रणा सुधारण्यात आली आहे.

दोन सदस्यीय औद्योगिक न्यायाधिकरण: वाद निवारणासाठी दोन सदस्यीय औद्योगिक न्यायाधिकरण स्थापन केले जाईल, जिथे कर्मचारी थेट दाद मागू शकतील.

'निरीक्षक-सह-सुलभकर्ता' प्रणाली: निरीक्षकांना दंडात्मक कारवाईऐवजी मार्गदर्शन आणि सहकार्य करण्यावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले आहे, ज्यामुळे 'गुन्हेगारीकरण' कमी होईल.

निश्चित मुदतीच्या कर्मचाऱ्यांसाठी लाभ: ठराविक कालावधीसाठी (निश्चित मुदत रोजगार) नेमलेल्या कर्मचाऱ्यांसाठी कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे समान वेतन, रजा व वैद्यकीय सुविधा मिळणे बंधनकारक केले आहे.

**३. सोशल सिक्युरिटी कोड २०२०**

व्यापक सामाजिक सुरक्षा: यात पीएफ (कर्मचारी भविष्य निर्वाह निधी), ईएसआयसी (कर्मचारी राज्य विमा महामंडळ), आरोग्य विमा, पेन्शन आणि ग्रॅच्युइटी यांसारख्या लाभांचा समावेश आहे.

गिग आणि प्लॅटफॉर्म वर्कर्स: या कायद्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना (उदा. डिलिव्हरी बॉय, कॅब चालक) प्रथमच कायदेशीर सामाजिक सुरक्षा प्रदान केली आहे.

ग्रीगेटर्सची उत्तरदायित्वे: ओला, उबर, झोमॅटो यांसारख्या ग्रीगेटर्स कंपन्यांना त्यांच्या वार्षिक उलाढालीच्या १% ते २% सामाजिक सुरक्षा निधीत योगदान देणे अनिवार्य केले आहे.

ग्रॅच्युइटी: निश्चित मुदतीच्या कर्मचाऱ्यांसाठी ग्रॅच्युइटीचा कालावधी पाच वर्षांऐवजी फक्त एका वर्षावर आणला गेला आहे.

**४. एकसमान सुरक्षा मानके २०२०**

एकसमान सुरक्षा मानके: सर्व उद्योगांसाठी एकसमान व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाच्या स्थितीचे मानके निश्चित केली आहेत.

आरोग्य तपासणी: ४० वर्षांवरील सर्व कामगारांसाठी नियोक्त्याने वार्षिक आरोग्य तपासणी मोफत करणे बंधनकारक केले आहे.

महिला कामगार: महिलांना रात्रीच्या शिफ्टमध्ये (रात्री ८ ते सकाळी ६) कामाची परवानगी देण्यात आली आहे, परंतु त्यासाठी आवश्यक सुरक्षा प्रोटोकॉल आणि त्यांची लेखी संमती घेणे अनिवार्य आहे.

धोकादायक उद्योगांना कठोर नियम: खाणकाम आणि इतर धोकादायक उद्योगांसाठी कठोर सुरक्षा नियम लागू करण्यात आले आहेत.

**कोणाला काय लाभ?**

नवीन कामगार कायद्यांमुळे विविध घटकांवर परिणाम अपेक्षित आहे:

असंघटित क्षेत्र: स्थलांतरित कामगार, कृषी, बांधकाम आणि सेवा क्षेत्रातील कोट्यवधी कामगार प्रथमच किमान वेतन आणि सामाजिक सुरक्षा कवचाखाली आले आहेत, ज्यामुळे त्यांच्या जीवनात स्थैर्य व सन्मान वाढेल.

गिग व प्लॅटफॉर्म वर्कर्स: कॅब ड्रायव्हर्स, डिलिव्हरी बॉय, डबिंग कलाकार यांसारख्या सुमारे ७०-८० लाख गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि रोजगाराची औपचारिक ओळख मिळाली आहे.

महिला कामगार: समान वेतनाची हमी, रात्रीच्या शिफ्टमध्ये कामाची संधी आणि तक्रार निवारण समित्यांमध्ये अनिवार्य प्रतिनिधित्व यामुळे महिलांचा श्रमसहभाग वाढण्यास मदत होईल.

उद्योगधंदे: अनेक जुन्या कायद्यांच्या जागी सिंगल लायसन्स, सिंगल रिटर्न मॉडेल आल्याने अनुपालनाचा भार लक्षणीयरीत्या कमी होईल. 'निरीक्षक-राज' संपुष्टात येऊन उद्योगांना उत्पादनक्षमतेत वाढ करण्याची संधी मिळेल.

**आर्थिक परिणाम**

कामगारांना वाढलेले किमान वेतन, ओव्हरटाईमचा दुप्पट पगार आणि सामाजिक सुरक्षा योगदानामुळे उद्योगांचा वेतन खर्च वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांवर याचा सुरुवातीला ताण येऊ शकतो. मात्र, अनुपालनातील सुलभता, औद्योगिक शांतता आणि कामगारांच्या वाढलेल्या उत्पादकतेमुळे दीर्घकाळात उत्पादकता खर्च कमी होईल आणि गुंतवणुकीला चालना मिळेल, ज्यामुळे रोजगार निर्मिती वाढेल.

**सामाजिक परिणाम**

४० कोटी कामगारांना सामाजिक सुरक्षा कवचाखाली आणणे, गिग कामगारांना प्रतिष्ठा देणे आणि आरोग्य तपासणी अनिवार्य करणे हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे कामगारांना केवळ सुरक्षाच नव्हे, तर सन्मान आणि स्थैर्य देखील मिळेल, ज्यामुळे आरोग्यदायी कार्यस्थळांचे प्रमाण वाढेल.

**प्रशासकीय परिणाम**

सिंगल लायसन्स आणि सिंगल रिटर्न प्रणालीमुळे कामगार मंत्रालयाचे कामकाज सुलभ होईल. मात्र, राष्ट्रीय किमान वेतन लागू करणे, ग्रीगेटरचे योगदान वसूल करणे आणि राज्या-राज्यातील अंमलबजावणीतील असमानता दूर करणे हे प्रशासकीय पातळीवर मोठे आव्हान असेल. औद्योगिक न्यायाधिकरणांवर सुरुवातीला कामाचा ताण वाढण्याची शक्यता आहे.

**कायदयासमोरील अडचणी**

नवीन कामगार कायदे हे अत्यंत प्रगतीशील असले तरी काही चिंता आहेत त्याचा विचार करणे गरजेचे आहे.

किमान वेतनाची अंमलबजावणी: राष्ट्रीय किमान वेतन लागू करण्यातील तांत्रिक आणि आर्थिक आव्हाने मोठी आहेत, कारण प्रत्येक राज्याच्या राहणीमानाचा खर्च वेगवेगळा आहे.

गिग कंपन्यांचा विरोध: सामाजिक सुरक्षेसाठी १-२% योगदान देण्याच्या तरतुदीला गिग कंपन्यांकडून तीव्र विरोध होण्याची शक्यता आहे, कारण यामुळे त्यांचा परिचालन खर्च वाढेल.

कामगार संघटनांची नाराजी: काही कामगार संघटनांनी औद्योगिक संबंध संहिता मधील 'कामावरून काढणे' आणि 'छटणी' संबंधीच्या काही तरतुदींवर नाराजी व्यक्त केली आहे.

नवीन कामगार संहिता 'विकसित भारत २०४७' च्या दिशेने एक निर्णायक पाऊल आहे असे मानले जात आहे. या कायद्यांचे उद्दिष्ट स्पष्ट आहे: कामगारांना सन्मान आणि सुरक्षा, उद्योगांना गती आणि सुलभता, आणि सरकारला पारदर्शकता. आंतरराष्ट्रीय स्तरावर चीन आणि सिंगापूरसारख्या देशांनी कामगार कायद्यांमध्ये केलेल्या सुधारणांच्या पार्श्वभूमीवर, भारताचे हे पाऊल जागतिक अर्थव्यवस्थेशी जुळवून घेणारे आहे. या कायद्यांमुळे देशातील ४० कोटींहून अधिक कामगारांचे जीवनमान सुधारण्याची मोठी क्षमता आहे. मात्र, केवळ कायद्यांची निर्मिती पुरेशी नाही. राज्या-राज्यात नियमांचे एकसमान आणि प्रभावी अंमलबजावणी करणे, हीच या सुधारणांची खरी कसोटी असेल. योग्य अंमलबजावणी झाल्यास, हे कामगार कायदे भारताला एक सुरक्षित, स्थिर आणि उत्पादक श्रमशक्ती प्रदान करतील, यामुळे जागतिकस्तरावर देशाची स्पर्धात्मकता वाढेल.

**राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**मो. ९८९०५७७१२८**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# औषध क्षेत्रातील नावीन्यपूर्ण संशोधन व विकासासाठी सुविधायुक्त भव्य केंद्र उभारणार : मंत्री नरहरी झिरवाळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आरोग्य विज्ञानासाठी जैवतंत्रज्ञान महत्त्वपूर्ण ठरत असून औषध क्षेत्रातील अशा नावीन्यपूर्ण संशोधन आणि विकासासाठी (लाईफ सायन्सेस इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटर) सुविधायुक्त भव्य केंद्र उभारण्यासाठी कार्यवाही केली जाईल. असे इनोवेशन पार्क ही काळाची गरज असून याच्या उभारणीतून महाराष्ट्र नावीन्यपूर्ण औषध निर्मिती क्षेत्रात आघाडीवर राहील, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले.

मंत्रालयात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस अन्न व औषध प्रशासन विभागातील सहआयुक्त (दक्षता) डॉ. राहुल खाडे, सहआयुक्त (औषधे) दा रा गहाणे, गिरीश हुकरे, व्ही. टी.जाधव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री झिरवाळ म्हणाले, देशातील गुजरात, आंध्र प्रदेश आणि हिमाचल प्रदेश या ठिकाणी संशोधन केंद्र उभी राहत असून औषधांसंदर्भात जैविक व रासायनिक संशोधनासाठी फॉर्म्युलेशन लॅबची सार्वजनिक-खासगी भागीदारीतून देखील उभारणी केली जात आहे. या केंद्राचे मुख्य उद्दिष्ट औषधनिर्माण (झहरीर), बायोटेक, मेडिकल उपकरणे, डायग्नोस्टिक्स आणि डिजिटल हेल्थ क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण स्टार्टअप्सना आधुनिक सुविधा, तांत्रिक मार्गदर्शन तसेच निधी उपलब्ध करुन देणे असणार आहे.



यातून राज्यातील औषध निर्मिती उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढ होईल, स्टार्टअप्सना मार्गदर्शन, प्रशिक्षण सुविधा उपलब्ध होतील. रोजगार निर्मिती होईल. जागतिक दर्जाच्या औषधे उत्पादनांसाठी परिपूर्ण संशोधन संस्था म्हणून ही संस्था काम करेल. असेही मंत्री झिरवाळ यांनी सांगितले.

बैठकीत अन्न सुरक्षा, गुण नियंत्रण व दक्षता शाखेचे अधिकारी उपस्थित होते. या इनोव्हेशन इन्क्युबेशन सेंटरमुळे राज्यातील आरोग्य, औषधनिर्मिती व बायोटेक क्षेत्रातील नाविन्याचा जागतिक केंद्रबिंदू बनण्यास मोठी गती मिळेल.यातून नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना मिळणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## इथिओपियामध्ये १२ हजार वर्षांनंतर ज्वालामुखीचा उद्रेक; १५ किलोमीटर उंच धुराचा लोट उसळला; भारतापर्यंत राख येण्याची शक्यता, २ उड्डाणे रद्द



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**इथिओपिया देशाच्या हेली गुब्बी प्रदेशात २३ नोव्हेंबर रोजी ज्वालामुखीचा उद्रेक झाला. जवळजवळ १०,००० वर्षांत पहिल्यांदाच इथिओपियामध्ये अशी घटना घडली. ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यानंतर राख आणि सल्फर डायऑक्साइडचा मोठा लोट आकाशात पसरला. हीच राख आता भारतातील दिल्ली आणि मुंबईत पोहोचली आहे. त्यामुळे भारताच्या नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने सर्व विमान कंपन्यांना एक कडक सूचना जारी केली, ज्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की ज्वालामुखीची राख असलेल्या क्षेत्रांवरून उड्डाणे टाळावीत.

इथिओपियामधील ज्वालामुखीचा धूर सामान्य वाटू शकतो, परंतु प्रत्यक्षात तो ज्वालामुखीची राख आहे, ज्यामध्ये लहान, काचेसारखे कण असतात. अशी राख जोरदार वाऱ्यांसह लांब अंतर प्रवास करू शकते, त्यामुळे आंतरराष्ट्रीय हवाई मार्गांवर परिणाम होतो. वाऱ्याने वाहून नेलेली ज्वालामुखीची राख आंतरराष्ट्रीय हवाई क्षेत्र (एफआयआर) पर्यंत पोहोचली ज्यावरून अनेक भारतीय विमाने दररोज उड्डाण करतात. यादरम्यान नागरी विमान वाहतूक महासंचालनालय आणि मुंबई-दिल्ली हवामान कार्यालयाने विमान कंपन्यांसाठी एसआयजीएमईटी जारी केला आहे.

वाऱ्याने राख अरबी समुद्रातून थेट भारतात

इथिओपियाच्या हैली गुब्बी ज्वालामुखीचा अचानक उद्रेक झाला आणि मोठ्या प्रमाणात ज्वालामुखीची राख आकाशात अनेक किलोमीटर वर गेली. ही राख वाऱ्यासोबत वाहून गेली आणि त्याचा थेट हवाई मार्गांवर परिणाम झाला. इथिओपियातून राखेचे ढग उठले आणि सुमारे ३०,०००-३५,००० फूट उंचीवर पोहोचले. वाऱ्याची दिशा आखाती देशांकडे होती, त्यामुळे राखेचा मोठा भाग ओमान आणि अरबी समुद्राकडे वाहू लागला. २४ नोव्हेंबर रोजी ही राख भारतात पोहोचली, म्हणजेच वाऱ्याने राख अरबी समुद्रातून भारतात खेचली. ही राख महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि मध्य भारतातील हवाई मार्गांजवळून जात आहे.

विमान कंपन्यांसाठी महत्वाचे मार्गदर्शक तत्वे

विमानतळ पातळीवर अतिरिक्त सुरक्षा उपाय देखील लागू करण्यात आले आहेत. ज्या भागात राख विमानापर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे अशा ठिकाणी धावपट्टी, टॅक्सीवे आणि हवाई क्षेत्राची विशेष तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आवश्यक असल्यास, ऑपरेशन्स निलंबित किंवा मर्यादित केले जाऊ शकतात. हवेतील राखेची हालचाल कधीही दिशा बदलू शकते, त्यामुळे विमान कंपन्यांना उपग्रह प्रतिमा, हवामान डेटा, एनओटीएएम, एसएचटीएएम आणि ज्वालामुखीय राख सल्लागारांचे २४/७ निरीक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



## निवडणुकीआधीच नियतीनं घात केला, नाशकात ठाकरे गटाच्या उमेदवाराचा झोपेतच मृत्यू

**मनमाड/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्याच्या मनमाड नगर परिषदेच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असतानाच शहरात धक्कादायक घटना घडली आहे. प्रभाग क्रमांक १० 'अ' मधील शिवसेना ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार नितीन वाघमारे यांचा सोमवारी रात्री मृत्यू झाला. सोमवारी दिवसभर प्रभागात फिरून प्रचार केल्यानंतर ते रात्री घरी येऊन झोपले होते. मात्र झोपेतच नियतीने घात केला आहे. अवघ्या २४ व्या वर्षीच नितीन वाघमारे यांनी जगाचा निरोप घेतल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अवघ्या २४ वर्षांचे असलेले नितीन वाघमारे हे एक उत्साही आणि तरुण उमेदवार होते. त्यांनी निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रचाराला जोरदार सुरुवात केली होती. नागरिकांशी भेटीगाठी, पदयात्रा आणि सभांच्या माध्यमातून ते सक्रिय होते.

## माझ्या मुलीची हत्या केली, नंतर आत्महत्या दाखवली; गौरी पालवेच्या वडिलांचा आरोप, पंकजा मुंडेंच्या पीएच्या अडचणी वाढल्या

दैनिक आपला विदर्भ

**बीर्ड/प्रतिनिधी :** राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांचा पीए अनंत गर्जेवर गौरी पालवे यांच्या कुटुंबीयांनी गंभीर आरोप केले आहेत. आपल्या मुलीची हत्या झाली, त्यानंतर ती आत्महत्या दाखवण्यात आल्याचा आरोप गौरी पालवेच्या वडिलांनी केली. या प्रकरणात जे काही करायचं ते करा, पण आम्हाला न्याय द्या अशी मागणी गौरीच्या कुटुंबीयांनी केली.

पंकजा मुंडे यांचा खासगी पीए असलेल्या अनंत गर्जे याच्या पत्नी डॉ. गौरी पालवे गर्जे हिचा २३ नोव्हेंबर रोजी मुंबईतील राहत्या घरात मृतदेह आढळला. गौरीने आत्महत्या केल्याचं पोलिसांनी नमूद केलं आहे. तर गौरीची हत्या करण्यात आल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला.

गौरी पालवेचे वडील म्हणाले की, या प्रकरणात गुन्हेगारांची नार्कोटेस्ट, ब्रेन मॅपिंग जे काही करायचं ते करा. माझ्या मुलीची हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणाची चौकशी न करता आत्महत्या कसे ठरवता? अनंत गर्जे याच्यासह त्याचा भाऊ आणि त्याची बहीण यांची चौकशी व्हावी. अनंत गर्जे त्याचे स्टेटमेंट वारंवार बदलत आहे. त्यामुळे त्याची चौकशी करावी.



या प्रकरणातील इतर आरोपींना अटक करा आणि त्यांचा सीडीआर आम्हाला द्या अशी मागणी गौरीच्या वडिलांनी केली. दोन सहकाऱ्यांच्या मदतीने गौरीला मारण्यात आले आहे. गौरीच्या डोक्यावर आणि छातीवर मारल्याच्या खुना आहेत. मग स्पॉट पंचनामा करून ही आत्महत्या कशी काय ठरवली? असा प्रश्न तिच्या वडिलांनी केला.

गौरीला मारहाण करण्यात आली, त्यामध्ये तिचा जीव गेला. त्यानंतर तिला रुग्णालयात घेऊन जाण्यात आल्याचा दावा गौरीच्या वडिलांनी केला. अनंतने आदल्या दिवशी फोन करून गौरीने आत्महत्या केल्याचं सांगितलं, तिचे प्रेत समोर असल्याचं सांगितलं. त्यामुळे अनंत गर्जे हा वारंवार त्याचे स्टेटमेंट बदलतोय असा दावा गौरीच्या वडिलांनी केला.

गौरीच्या हत्येच्या आरोपात नणंद आणि दिराला अटक करण्याची मागणी गौरीच्या वडिलांनी केली आहे, गौरी पालवेच्या वडीलांनी वरळी पोलिसांना पत्र लिहलं आहे. गौरीच्या हत्याप्रकरणात फक्त अनंत गर्जेला अटक झाली, या प्रकरणात दीर अजय गर्जे आणि नणंद शितल आंधळे मोकाट फिरत आहेत, असा उल्लेख पत्रात करण्यात आला. तर अनंत आणि गौरी राहत होते त्या बिल्डींगचा उउढत देण्याचीही मागणी गौरीच्या वडिलांनी केली आहे.

डॉ. गौरी पालवे आत्महत्येप्रकरणी मंत्री पंकजा मुंडेंच्या पीएला अटक करण्यात आली आहे. वरळी पोलिसांनी घटनेच्या दिवशी रात्री १ वाजता अनंत गर्जेला अटक केली. त्यानंतर त्याला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

घरगुती वादातून डॉ. गौरी पालवेने मुंबईतील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. गौरीच्या कुटुंबीयांनी मात्र ही आत्महत्या नसल्याचं सांगत, वरळी पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली. अनंत गर्जेसह बहिण शीतल गर्जे आंधळे, दीर अजय गर्जेविरोधात, आत्महत्येस प्रवृत्त करणे, सासरकडून क्रूरतेची वागणूक देणे आणि धमकावल्याच्या आरोपाखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.


## स्मृती मानधनाच्या वडिलांच्या प्रकृतीबाबत अपडेट, अँजिओग्राफीचे रिपोर्ट्स आले समोर

**मुंबई/प्रतिनिधी :** स्मृती मानधनाचे वडील श्रीनिवास मानधना यांना तिच्या लग्नादिवशी अचानक हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं होतं. स्मृतीच्या वडिलांची प्रकृती बिघडल्याने स्मृती व पलाशचा २३ नोव्हेंबरला होणारा लग्न सोहळा रद्द करण्यात आला. स्मृती-पलाशच्या लग्नापूर्वीच्या विधींना शुक्रवारपासून सुरूवात झाली होती. हळद, मेहंदी, संगीत असे कार्यक्रम झालेले असताना लग्नाच्या काही तास आधी तिच्या बाबांना रूग्णवाहिकेतून रूग्णालयात दाखल केलं गेलं. याबाबत आता मोठी अपडेट समोर येत आहे.

स्मृती मानधनाच्या वडिलांना लग्नादिवशी सकाळी छातीत डाव्या बाजूला दुखायला लागलं होतं. काही वेळाने रूग्णवाहिकेतून त्यांना रूग्णालयात नेण्यात आलं. लग्नस्थळी रूग्णवाहिका आल्याने एकच खळबळ उडाली होती. कालांतराने स्मृतीच्या मॅनेजरने तिच्या वडिलांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांना रूग्णालयात दाखल केल्याची माहिती दिली व लग्नसोहळा स्थगित झाल्याचं जाहीर केलं. स्मृतीच्या वडिलांना हृदयविकाराचा सौम्य झटका आला होता.

स्मृतीच्या वडिलांची तपासणी केल्यानंतर त्यांना हृदयविकाराचा झटका येण्याची लक्षणं असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं. श्रीनिवास मानधना यांचं ब्लड प्रेशर वरखाली होत असल्याने त्यांना देखरेखीखाली रूग्णालयात ठेवण्यात आलं होतं. स्मृतीच्या वडिलांची आज म्हणजेच २५ नोव्हेंबरला सकाळी अँजिओग्राफी करण्यात आली आणि त्यामध्ये कोणते ब्लॉकेज नसल्याचे स्पष्ट झालं आहे. त्यामुळे रूग्णालयातून त्यांना डिस्जार्च देण्यात आला आहे. स्मृतीच्या वडिलांना रूग्णालयात दाखल केल्यानंतर सर्वहित हॉस्पिटलचे डॉक्टर नमन शाह यांनी माहिती दिली होती, डॉक्टरांनी सांगितलं होतं की, ''स्मृती मानधनाचे वडिल श्रीनिवास मानधना यांना १, १.३० च्या सुमारास छातीच्या डाव्या बाजूस दुखायला लागल्याने हार्ट अटॅकची लक्षणं दिसून आली. त्यांना तात्काळ सांगलीतील सर्वहित रूग्णालयात तपासणीसाठी दाखल करण्यात आलं. त्यांच्या कार्डियाक एन्झाइम्सच्या पातळीत किंचित वाढ झाल्याचं आढळलं आहे, त्यामुळे त्यांच्यावर सतत लक्ष ठेवणं आवश्यक आहे.

## शब्दकोडे क्र. 18



आडवे शब्द

१. रवळ ४. पांडुरंगाचे हात अशा स्थितीत आहेत ७. घराण्याची प्रथा ११. मोजणी १३. संसदेचा सदस्य १५. मनाचे श्लोक लिहिणारे संत १७. सैन्याचा दाणागोटा १९. शीखांचे संबोधन २०. आकाश २१. बोटाच्या टोकावरील कडक आवरण २२. गजऱ्यातील सुगंधी वनस्पती २४. कमी बोलणारा २५. तृप्त न होणारी भूक २७. झाडाभोवतीचा कट्टा २८. डोळे ३०. दक्ष ३२. पैशाचा ढीग ३३. डावा ३५. सज्जन, प्रामाणिक ३६. शंकर (हिंदी) ३८. तेजस्वी, राजबिंडा ४०. बेडकांचे ओरडणे ४३. रक्षण करणारा ४५. जामीन (हिंदी) ४७. डोक्याला थंडावा देणारी व केसांची वृद्धी करणारी सुगंधी वनस्पती ५०. अर्धी ओंजळ ५२. माणूसकी ५९. लोकांसमोर न घाबरता बोलणारा ६०. नवरा ६१. कोशिंबिरीचे फळ ६३. पवित्र ६५. आवरण ६६. तेज, कांती ६८. बटवडा, वितरण ७०. रक्त देणे ७३. -- -- धन म्हणजे सर्वस्व ७४. क्वचित ७७. प्रेरणा, गती ७८. शहर, मोठे गाव ८०. देवाण-घेवाण ८३. रहित, बाद ८४. अटीची भाषा ८५. वेडावाकडा

उभे शब्द

१. खबदाड २. श्रीकृष्णाचे एक नाव ३. मातीचा कण ४. गुणज्ञ ५. कोठार, गोदाम ६. फळातील द्रव ७. पंख ८. पराजय ९. कबीराचे देव १०. हास्याचे पीक १२. सेवक १४. संत रामदासांनी लिहिलेला ग्रंथ १६. राक्षस १८. एकरुप २३. दुर्भिक्ष्य, चणचण २४. सेपे नसलेले २६. शंकराचे एक नाव २७. सीमा, मर्यादा २९. मृत्यूचा राजा ३१. फुरसत ३४. डाळीचे पीठ ३५. धनको, कर्ज देणारा ३७. तीनपट ३९. हिशोबाची एक बाजू ४१. मुंबईचा घरगडी ४२. अत्यंत तिखट मसालेभात ४४. माफी मागणारा ४६. तापविणारा सूर्य ४८. संध्याकाळ ४९. पाणी व जमीन दोन्हीकडे वास्तव्य करणारे प्राणी उदा. कासव, मगर इ. ५१. हळू, संथ ५३. चामखीळ ५४. कहाणीतील गाव ५६. त्रिगुणांतील दुसरा- सत्व -- तम ५७. सन्मानाची रक्कम ५८. दही घुसळून केलेले पेय ६२. कोवळा अंकुर ६४. बशीचा जोडीदार ६७. वेदना, त्रास ६८. बुटका बटु ६९. विसरभोळा ७१. वैरी, खटला दाखल करणारा ७२. अकस्मात ७५. शिकार ७६. ब्राह्मण ७९. भुक्कड ८०. बाहेरच्या विरुद्ध ८१. खटला ८२. तोल, डौल

### शब्दकोडे क्र. 17 चे उत्तर

आडवे उत्तर

१.नराधम ४.सरकार ७.कासार १०.दारा ११.मस्त १२.करवत १४.यच्चयावत १५.फारकत १६.पत १७.नवनीत २०.लाचार २२.बाला २३.मालक २५.घड २६.संपादकीय २८.नटराज ३०.बक ३२.तर ३३.नवस ३४.लयबद्ध ३५.भगवान ३७.वाचा ३९.कल ४२.रजई ४३.राजाराणी ४४.न्यायालय ४५.हत्या ४६.गंधक ४८.काजवा ४९.टपोरा ५१.जागर ५२.लता ५४.पर्वत ५६.चपापणे ५८.उदार ५९.अवसर ६०.बेसुमार ८२.जननमरण ६४.सखा ६७.नस ६८.रसदार ६९.वंदनीय ७२.रटाळ ७४.रटरट ७६.तडकाफडकी ७७.रोज ७८.कसर

उभे उत्तर

१.नमनाला घडाभर तेल २.रास्त ३.मकर ४.सवत ५.रत ६.रयत ७.कायापलट ८.साव ९.रतन १०.दामिनी १३.रकमपात १५.फार १६.पलायन १८.वर्ण १९.तडक २१.चाड २२.बाकी २३.मानसकन्या २४.कराल २७.दरवाजा २९.जयजयकार ३०.बद्ध ३१.सवाई गंधर्व ३६.गज ३८.चाराचुरा ४०.लयास जाणे ४१.आत्या ४३.राकट ४५.हवालदार ४७.आसपास ५०.पोळ ५३.तार ५४.पपनस ५५.तलम ५६.चवदार ५७.परसदार ५८.उमा ६१.सुरवंट ६२.जनमत ६३.रडारड ६५.खारट ६६.पाय ७०.नीरस ७१.मोका ७३.टाकी ७५.रस्ता

वृत्तविशेष...

## मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व इतर शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित तसेच कायम विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी मोहनकुमार ग. व्यवहारे यांनी केले आहे.

सन २०२५-२६ शैक्षणिक सत्रासाठी महाडीबीटी पोर्टल http://mahadbt.maharashtra.gov.in वर नवीन तसेच नुतनीकरणाचे अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांनी योजनेची कार्यप्रणाली व इतंभुत माहिती करीता शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी २०२२ तसेच महाडीबीटी पोर्टलवरील सूचनांचा अभ्यास करून निर्धारित मुदतीत अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

अभ्यासक्रम व पात्रता : अकरावी, बारावी, बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., बी.एसडब्ल्यू, एम.एसडब्ल्यू, बी.लिब., एम.लिब., ए.एन.एम., जी.एन.एम., डी.एड., बी.एड., एम.एड. तसेच शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण, कृषी, पशुधन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील अनुसूचित जमातीचे विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेस पात्र आहेत. आवश्यक कागदपत्रे: बोनाफाईड प्रमाणपत्र, जातीचा दाखला, उत्पन्न प्रमाणपत्र, महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, टी.सी., शैक्षणिक मार्कशीट, जात वैधता प्रमाणपत्र.

## अजित पवारांच्या ताफ्यातील गाडीने चौघांना उडवलं, महिलेचा दुर्दैवी मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : दोन दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील अग्निशमन दलाच्या वाहनाने धडक दिल्याने गंभीर जखमी झालेल्या महिलेचा अखेर उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. कुसुम विष्णू सुदे (वय ३०) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, सुदे कुटुंबीयांवर मोठा दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

ही दुर्घटना उपमुख्यमंत्री अजित पवार हे परतूरहून औसा येथे एका प्रचारसभेसाठी जात असताना घडली होती. तेलगाव-धारूर महामार्गावरील धूनकवड फाटा येथे ताफ्यातील अग्निशमन दलाच्या गाडीने विष्णू सुदे यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

हा अपघात इतका भीषण होता की, दुचाकीचा पूर्णपणे चुराडा झाला आणि दुचाकीवरील सुदे पती-पत्नी आणि त्यांच्या दोन लहान मुली रस्त्यावर फेकल्या गेल्या. ताफ्यातील वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत कुसुम सुदे, त्यांचे पती विष्णू दामोदर सुदे (वय ३५), आणि त्यांच्या दोन निष्पाप मुली रागिणी (वय ९) व अक्षरा (वय ६) हे चौघेही गंभीर जखमी झाले होते.

स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत जखमींना तातडीने धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, आज (२५ नोव्हेंबर) उपचारादरम्यान गंभीर जखमी झालेल्या कुसुम विष्णू सुदे यांचा मृत्यू झाला. कुसुम सुदे यांच्या निधनाने दोन निष्पाप लहान मुली आईच्या मायेला मुकल्या आहेत. एका क्षणात संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने स्थानिक नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

## कार्यक्रमावरून परत येताना घडला अनर्थ, एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी अंत

**वर्धा/प्रतिनिधी** : वर्ध्याच्या सेलू-काटे इथल्या कुटुंबावर काळाने झडप घातल्याची हृदय पिळवटून टाकणारी दुर्घटना रात्रीच्या सुमारास घडली. चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील सेलुकाटे येथील रहिवासी पती-पत्नी आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला. अपघातात आणखी एक मुलगा गंभीर जखमी असून त्याच्यावर सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सेलूकाटे इथल्या नवोदय विद्यालयाजवळ रात्रीच्या सुमारास घडली.

पती सोमनाथ भोयर (३८), पत्नी निकीता सोमनाथ भोयर (३२) आणि मुलगा पुरब सोमनाथ भोयर (६) असं मृत पावलेल्या तिघांची नावं आहेत. तर तिघेही गणेशनगर इथं एका कार्यक्रमासाठी गेले होते. भोयर कुटुंब गणेशनगर येथून कार्यक्रम आटोपून दुचाकीवरून आपल्या घरी परतत असताना भरधाव चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडक इतकी भयंकर होती की तिन्ही जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर एक मुलगा गंभीर जखमी झाला. धडक झाल्यानंतर वाहन चालकाने जागेवरून पळ काढल्याची प्राथमिक माहिती आहे. चारचाकी वाहन वायगाव इथले आहे. घटनास्थळी तातडीने नागरिकांनी धाव घेत जखमी मुलाला त्वरित सावंगी येथील रुग्णालयात हलविले. डॉक्टरांनी त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले आहे. अपघातानंतर परिसरात शोककळा पसरली असून अचानक झालेल्या या अपघातात संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# शहराच्या विकासासाठी किशोर गारोळे नगराध्यक्षपदी निवडून द्या

### आमदार हारुन खान यांचे गवळीपुऱ्यातील नागरिकांना आवाहन, किशोर गारोळे यांच्या प्रचाराचा माहोल





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार व शहरवासीयांना आपलेसे वाटणारे उमेदवार म्हणून किशोर गारोळे यांची ओळख आहे. सर्वांच्या सुखदु:खात हिरीरीने सहभागी होणारा तसेच विकासाची जाण असणारा उमेदवार किशोर गारोळे यांना नगराध्यक्षपदी निवडून द्या, असे आवाहन वर्सोवा मतदार संघाचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार हारुन खान यांनी केले. ते येथील मदीना चौक येथे २४ नोव्हेंबर रोजी आयोजित सभेत बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रमजान हिरा चौधरी होते.तर प्रमुख उपस्थितीमध्ये आमदार सिद्धार्थ खरात, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे उपजिल्हाप्रमुख प्रा. आशिष रहाटे, माजी नगराध्यक्ष विलासराव चनखोरे, अंधेरीचे एकनाथ केरकर, शिवसेना उबाठा तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, युवासेना तालुकाप्रमुख ॲड. आकाश घोडे, शिवसेना उबाठा उपशहरप्रमुख शेख सलमान, माजी नगर परिषद उपाध्यक्ष शेख चाँदभाई, राष्ट्रवादीचे दत्ता पाटील घनवट, भीमशक्तीचे भाई कैलास सुखदाने, माजी न.प.सभापती भास्करराव गारोळे, सोपान देबाजे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार किशोर गारोळे, प्रभाग क्रमांक ३ अ च्या उमेदवार पौर्णिमा गवई, प्रभाग ३ ब चे उमेदवार छट्टू हित्तू गवळी, प्रभाग ४ अ च्या उमेदवार नगमा रफिक गवळी, प्रभाग ४ ब चे उमेदवार पठाण सलमान खान, प्रभाग ५ अ च्या उमेदवार शेख खुर्शीदबी इस्माईल, प्रभाग क्रमांक ५ ब चे उमेदवार शेख सलमान शेख चाँद, प्रभाग क्रमांक ६ अ च्या उमेदवार दिपाली सांगळे, प्रभाग क्रमांक ६ ब च्या उमेदवार लताबाई जुनघरे, प्रभाग क्रमांक ७ अ च्या उमेदवार शेख शहनाजबी शेख अफसर, प्रभाग क्रमांक ७ ब चे उमेदवार अली राजेक जैनुमिया आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार हारुन खान म्हणाले, की मेहकर शहरातील प्रत्येकजण किशोर गारोळे बनला आहे. त्यामुळे मेहकर शहर हे किशोर गारोळेमय बनले आहे. जात-धर्माच्या नावावर मतदान मागणाऱ्यांना विकासाबाबतचे प्रश्न आवर्जून विचारा, असेही ते म्हणाले.

जे आतापर्यंत पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छता, दर्जेदार स्विमिंग पूल, रोजगार देऊ शकले नाही, त्यांना सपशेल नाकारा. निवडणूक आली की त्यांना जात-धर्म आठवतो, पण एऱ्हवी मात्र स्वत:चेच घर भरायचे असते. केवळ मतापुरताच वापर करणाऱ्यांना आवर्जून धडा शिकवा अन् माणुसकीचे मूर्तीमंत उदाहरण किशोर गारोळे यांना प्रचंड बहुमताने निवडून द्या, आवाहन त्यांनी केले.

तर, यावेळी आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले, की किशोर गारोळे हे महाराष्ट्रातून एक नंबरवर आले पाहिजे. राज्यात सर्वाधिक मत घेणारे नगराध्यक्ष म्हणून त्यांची इतिहासात नोंद झाली पाहिजे. शहराच्या विकासासाठी नगराध्यक्षपदी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे किशोर गारोळे यांना संधी द्या असे आवाहन यावेळी त्यांनी केले. यावेळी प्रा. आशिष रहाटे म्हणाले, की किशोर गारोळे हे मेहकरचा विकास करण्यासाठीच निवडणुकीत उभे राहिले आहेत. त्यांच्यासह सर्व नगरसेवक, नगरसेविका पदाच्या उमेदवारांना रेकॉर्डब्रेक मतं देऊन विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

विलासराव चनखोरे म्हणाले, की जे यापूर्वी नगराध्यक्ष राहिले आहेत, त्यांना आता कसला विकास साधायचा आहे. जे करायचे होते, ते आतापर्यंत का केले नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित करून विरोधकांवर सडकून टीका केली. यावेळी कैलास सुखदाने यांनीही दमदार भाषण केले. किशोर गारोळे म्हणाले, की मेहकर शहरातील युवक अन् महिलांना रोजगार देणे, नियमितपणे पिण्याचे पाणी अन् स्वच्छता पुरविणे, शहरामध्ये माणुसकीमय-चैतन्यमय आनंदमय अन् खेळीमेळीचे वातावरण ठेवणे हे माझे ध्येय आहे. तुम्हा सर्वांच्या आग्रहास्तव मी निवडणूक लढवित आहे. तुमच्या आशीर्वादाने प्रचंड मत घेऊन मी विजयी होणार आहे, असा विश्वासदेखील त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन अन् आभार निसार अन्सारी यांनी केले.

या कार्यक्रमाला युनुस बागवान, रहिम पठाण, पत्रकार अय्युब पठाण, अकबरभाई गवळी, अमिन चौधरी, इमाम परसुवाले, नुराभाई परसुवाले, रमजान परसुवाले, उस्मानभाई नौरंगाबादी, समीर मिरचीवाले, जावेद चौधरी यांच्यासह गवळीपुऱ्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्ते अन् किशोर गारोळे यांच्या सर्व चाहत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मुंबई, दिल्ली सोडा, कर्ज झाले तरी चालेल, मेट्रो शहरांमधील प्रदूषणावर लंडनस्थित भारतीय तंत्रज्ञाची पोस्ट चर्चेत

नवी दिल्ली : दिल्लीतील खालावत चाललेल्या हवेच्या गुणवत्तेबाबत सर्वत्र चर्चा सुरू असताना, एका सोशल मीडिया पोस्टमुळे शहरातील प्रदूषण पातळीबाबतचा नवा वाद निर्माण झाला आहे. कुणाल कुशवाह नावाच्या एका तंत्रज्ञाने एक्सवर दिल्ली भेटीनंतर, त्यांना प्रदूषणामुळे श्वास घेण्यास त्रास झाल्याचे सांगितले आहे. या पोस्टमध्ये त्यांनी नागरिकांना इतर सर्व गोष्टींपेक्षा त्यांच्या आरोग्याला प्राधान्य देण्याचे आणि 'कर्जात बुडाले तरी चालेल पण दिल्ली सोडा', असे आवाहन केले आहे. यावेळी त्यांनी मुंबईबाबत केलेले भाष्यही चर्चेत आले आहे.

कुणाल कुशवाह यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, ''मला वाटायचे की, दिल्लीतील लोकांसाठी हवेची गुणवत्ता खरोखर किती वाईट असू शकते? मला माहिती होते की ती वाईट आहे, परंतु ती इतकी वाईट असेल असे मला वाटले नव्हते. मी दिल्लीत वाढलो आणि दिल्लीतच शिक्षण घेतले, पण कधीही इतका मोठा फरक जाणवला नव्हता. ''पण मी चुकलो. हे एक संकट आहे आणि खरे सांगायचे तर, हे शहर सोडणे ही तुमची सर्वोच्च प्राथमिकता असायला हवी. काही वर्षे लंडनमध्ये राहिल्यानंतर आणि स्वच्छ हवेत श्वास घेतल्यानंतर, दिल्लीत उतरताच मला प्रदूषणाची चव आणि वास येऊ लागला. घसा खवखवू लागला आणि फुफ्फुसात सुया टोचल्यासारखे वाटू लागले.

## संविधान अमृत महोत्सव निमित्त विविध उपक्रम; २६ नोव्हेंबर ते २६ जानेवारी दरम्यान शिबीराचे आयोजन

**बुलढाणा/प्रतिनिधी** : भारतीय संविधानास ७५ वर्षपूर्ती निमित्त संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान कार्यक्रमांतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीमार्फत २६ नोव्हेंबर ते २६ जानेवारी या कालावधीत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये कार्यालयात दररोज संविधान वाचन, भारतीय संविधानाचे महत्व तसेच जातवैधता प्रक्रियेबाबत मार्गदर्शन असे विविध उपक्रम राबविले जाणार आहे.

सन २०२५-२६ या वर्षात विविध व्यावसायिक अभ्यासक्रमात राखीव प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी समितीकडून आवश्यक ते सर्व सहाय्य पुरविण्यात येणार आहे. जातवैधता प्रमाणपत्र मिळविताना अर्जदारांना येणाऱ्या अडचणींबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शनही दिले जाणार आहे. ज्या दावा प्रकरणांमध्ये त्रुटी आढळल्या आहेत, त्याबाबत अर्जदारांना पोर्टलमार्फत व ई-मेलद्वारे सूचना पाठविण्यात येत असून, अर्जदारांनी तत्काळ समिती कार्यालयात उपस्थित राहून त्रुटी पुर्तता करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. समितीकडून अशा प्रकरणांवर प्राधान्याने कार्यवाही केली जाणार आहे.

समितीचे अध्यक्ष, उपायुक्त तसेच सदस्य, संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बुलडाणा यांनी अर्जदार व पालकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घेण्यासाठी समिती कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी केले आहे.

## कुऱ्हा गावात कुष्ठरोग शोध मोहीम: ७२३ नागरिकांची केली तपासणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : कुष्ठरोग निर्मूलनाच्या उद्देशाने जिल्हा आरोग्य विभागातर्फे आज मौजे कुऱ्हा येथे एलसीडीसी अंतर्गत विशेष कुष्ठरोग शोध मोहीम व सर्व्हेक्षण राबविण्यात आले. यावेळी कुऱ्हा गावातील ७२३ नागरिकांची तपासणी करण्यात आली असून तपासणीदरम्यान कुष्ठरोगाचा एकही नवीन रुग्ण आढळून आला नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. हरी पवार यांच्या देखरेखीखाली हा उपक्रम पार पडला. तालुका नोडल अधिकारी डॉ. अमित भामरटकर आणि अवैद्यकीय सहाय्यक पी. एस. ढोण यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पथकाच्या कामकाजाची सखोल पाहणी केली. त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत कुष्ठरोगाविषयी जागरूकता, प्रारंभिक लक्षणे आणि लवकर निदानाचे महत्त्व याबाबत माहिती दिली. ग्रामस्थांनी या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शवला.

मोताळा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निलेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कुऱ्हा गावात एकूण ६ आरोग्य पथकाद्वारे १४५ घरांतील ७२३ नागरिकांची तपासणी करण्यात आली. यापैकी ८ जणांमध्ये त्वचेवरील विविध प्रकारच्या तक्रारी आढळल्या असून त्यांची तपासणी वैद्यकीय अधिकारी (कुष्ठरोग) डॉ. के. व्ही. राठोड यांनी केली. तपासणीदरम्यान कुष्ठरोगाचा एकही नवीन रुग्ण आढळून न आल्याची महत्त्वाची माहिती समोर आली.

तपासणीनंतर पथकांची आढावा बैठक घेण्यात आली. तपासणीदरम्यान आढळलेल्या उणीवांवर चर्चा करून आगामी सर्व्हेक्षण अधिक प्रभावी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. या मोहिमेत प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मयूर घोती, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सचिन रावत, डॉ. अक्रम सय्यद, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, सेविका व आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.

कुष्ठरोग शोध मोहीम दि. १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविली जाणार असून घराघरात येणाऱ्या आरोग्य पथकाकडून प्रत्येक नागरिकांनी तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी केले.

# नियमित पाणीपुरवठ्याची केंद्रीय मंत्र्यांची ग्वाही





दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी** : ''लोणार नगर पालिकेची सत्ता जनतेने आमच्या हातात दिल्यास शहरात नियमित पाणीपुरवठा सुरू करू,'' अशी ठाम ग्वाही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली. शिवसेना (शिंदे गट) उमेदवारांच्या समर्थनार्थ आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते.

जाधव म्हणाले, ''शहराच्या विकासासाठी शिवसेनेलाच सत्ता द्या. लोणार नगर पालिकेला निधी कमी पडू देणार नाही. देशभरात भाजपशिंदे सेना एकजूट आहे, मात्र लोणारमध्ये भाजपाने एकला चलोची भूमिका घेतल्याने मतांचे विभाजन होऊ नये. भाजपाला मत म्हणजे काँग्रेसलाच मत असल्याने मतदारांनी सावध राहावे.'

'केंद्रीय मंत्र्यांनी राज्य आणि केंद्रातील विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती देत सांगितले की, ७ लाखांपर्यंत उपचारांसाठी कोणत्याही दाखल्याची गरज नसून ७० वर्षांवरील नागरिकांना योजनांचा स्वयंचलित लाभ मिळत आहे. 'लाडकी बहीण' योजनेत हजारो महिलांना थेट आर्थिक फायदा झाला असून ११ हजार घरकुलांची कामे पूर्ण झाली आहेत. आंबेडकरांनी दिलेला मतदानाचा अधिकार शहराच्या विकासासाठी वापरा, असे आवाहन त्यांनी केले.माजी आमदार संजय रायमुलकर यांनी सध्याच्या आमदारांवर टीका करताना सांगितले, नवीन काहीही काम मंजूर न करता आमच्या मंजूर केलेल्या कामांचेच उद्घाटन होत आहे. सत्ता मिळताच प्रलंबित सर्व विकासकामांना गती देऊ.

शिवसेना जिल्हाप्रमुख बळीराम मापारी म्हणाले, गेल्या १० वर्षांत सत्ता नसूनही आम्ही लोकांसोबत राहिलो. आता सत्ता दिल्यास शहरातील रस्ते, नाल्या, पाणी, वीज आदी मूलभूत सुविधा प्रत्येक वॉर्डात अत्यंत दर्जेदार पद्धतीने उभारू.

दरम्यान, नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची महत्त्वपूर्ण बैठक शिवसेना प्रचार कार्यालयात पार पडली. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संगीताताई संतोषराव मापारी यांच्यासह सर्व १० प्रभागांतील उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीत केंद्रीय मंत्री जाधव यांनी नागरिकांना आवाहन केले. लोणारच्या प्रगतीसाठी धनुष्यबाणावर बटन दाबा आणि शिवसेनेला भक्कम विजय द्या.